# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स २६९०००७

Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


परिपत्रक

का.क्र.१५/अर्थसं/२०१६-१७/ee

20 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय :- **Aadhaar Card Number (Unique Identification)/**
विदयार्थ्यांच्या स्वतःच्या बँक खात्या बाबत.
**आर्थिक दृष्टया मागास विदयार्थ्यासाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना**
**(संकेत स्थळ :-www.dtemaharashtra.gov.in/EBC Concession )**

उपरोक्त योजनेचे ऑनलाईन नविन/ नुतनीकरणाचे अर्ज भरतेवेळी विदयार्थ्यांनी स्वतःचा आधार कार्ड क्रमांक अचूक भरावा व बँके कडून आधार कार्ड क्रमांक आपल्या स्वतःच्या बँक खात्याशी संलग्न (seeding) करुन खात्री करुन घ्यावी. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या ज्या आर्थिक दृष्टया मागास विदयार्थ्यांनी आधार कार्ड काढले नाहीत त्या विदयार्थ्यांनी आधार कार्ड क्रमांक व स्वतःचे बँक खाते काढुन घ्यावे व आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न (seeding) करावे जेणे करुन संस्थेमार्फत EBC ची रक्कम विदयार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करणे सुलभ होईल.

तरी याबाबत सर्व व्यावसयिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थाच्या प्राचार्य/ संचालक/ अधिष्ठाता यांनी व्यक्तीशः लक्ष घालून संस्थास्तरावर विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाची नोंदणी करण्यासाठीची तसेच आधार कार्डावर ज्या विद्यार्थ्याचे नाव बरोबर नाही त्या नावामध्ये दुरुस्तीसाठीची
(संकेत स्थळः https://ssup.uidai.gov.in/web/guest/update) संबंधीत यंत्रणेशी संपर्क साधुन विशेष मोहिम राबवावी. अशा सूचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात.

विदयार्थ्यांकडुन ऑनलाईन अर्ज भरतेवेळी आधार कार्ड क्रमांक व संलग्न बँक खात्याची माहिती अचूक राहील याबाबतची सूचना दर्शनी भागात सूचना फलकावर लावून विदयार्थ्यांना कळविण्यात यावे, तसेच विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये भरलेली माहिती संस्थांनी काळजीपुर्वक तपासावी व अचूक असल्याची खात्री करुन ऑनलाईन अर्ज कन्फर्म करावे तसेच विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे आपल्या स्तरावर सूचित करावे.

5933 26/9/16

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/EBC/२०१६/3179
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 30 SEP 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

**१) प्राचार्य, सर्व संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरिल परिपत्रकाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.**

**२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर ~~सकल्पाकरीता~~.** प्रदर्शित करण्याकरीता.